


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६७८. वा | गुरुवार | दि. ०८ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# अवैध सावकार कृपलानी याच्यावर अखेर कारवाईचा बडगा...


## दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने उघडकीस आणले होते कृपलानीचे कारनामे

**जनसंचलन/ बुलढाणा**

अकोला येथे वास्तव्यास असलेला अवैध सावकार मनोहर कृपलानी याच्यावर अखेर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांच्या वतीने धाड टाकून कारवाई करण्यात आली आहे. मनोहर कृपलानी याची कृष्णकृत्ये सर्वप्रथम सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने जगासमोर आणली होती. त्या वेळी तत्कालीन जिल्हा उपनिबंधकांनी अत्यंत ढिलाई दाखवत कारवाईस टाळाटाळ केली होती. परंतु देर आए दुरुस्त आए या उक्तीप्रमाणे अखेर कृपलानी सह इतर याच्यावर विद्यमान जिल्हा उपनिबंधकांद्वारे कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे अवैध सावकारी करणाऱ्यांचे धाबे दणाणले शिवाय राहणार नाही. अकोला शहरात बुधवार दि. ७ फेब्रुवारी २०२४ रोजी वेगवेगळ्या ठिकाणी सकाळी सात वाजेपासून धाडसत्र राबवून अवैध सावकारी करणाऱ्यांच्या विरोधात जोरदार मोहीम उघडण्यात आली. या धाडसत्रामध्ये सहकार विभागाची १२ पथके सामिल झाली होती. बुधवारी पहाटे पासूनच ही कारवाई सुरू झाली. अकोला शहरातील गोरक्षण रोड, सिंधी कॅम्प व जय हिंद चौकात ही कारवाई करण्यात आली होती. सिंधी कॅम्प इथे करण्यात आलेल्या कारवाईत मनोहर कृपलानी सह इतर यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडे प्राप्त झालेल्या एका तक्रारीत कृपलानीच्या अवैध सावकारीची माहिती प्राप्त झाली होती. अडगाव येथील श्रीकृष्ण मधुकर धर्मे व बुलडाणा जिल्ह्यातील काही पीडितांनी कृपलानी याच्याकडून व्याजाने पैसे घेतले होते. धर्मे हे शेतीबरोबरच कापसाचा व्यवसाय करायचे तसेच बांधकाम व्यवसायातही ते होते. कृपलानीकडून घेतलेली रक्कम ही धर्मे यांनी व्याजासह परत केली होती. त्यानंतर त्यांच्या नियमित व्यवहार होत राहिले. दरम्यान, धर्मे यांनी आपल्या माध्यमातून काही जणांना कृपलानीकडून व्याजाने पैसे मिळवून दिले होते. हे सर्व व्यवहार होत असताना कृपलानी याने धर्मे यांच्याकडून अव्वाच्या सव्वा व्याज लावून पैसे वसूल केले. असाच प्रकार कृपलानी याने अनेकांसोबत केला. काही लोकांची जमीन देखील आपल्या नावावर बळजबरीने करून घेतली. दरम्यान, या विषयाची माहिती प्राप्त झाल्यानंतर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने सर्वात आधी वृत्त प्रकाशित केले होते. त्या वेळी कृपलानी याने दैनिक जनसंचन व सिटी न्यूजला धमकावण्याचा प्रयत्न केला होता. तसेच दैनिक जनसंचलनच्या विरोधात गरळ ओकण्याचे काम केले होते. परंतु तरीही दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज कृपलानी याचे काळे कारनामे उघड करीत राहिले. कृपलानी याने अनेकांकडून प्रचंड व्याज वसूल केले, पठाणी पद्धतीने पैशांची वसुली केली. पैशांसाठी अनेकांचा शारीरिक व मानसिक छळ केला, सरकारी नियमांना पायदळी तुडवले. हे सर्व करून कृपलानी अत्यंत साळसूदपणे जगत होता. कारण तत्कालीन ढिसाळ जिल्हा उपनिबंधक अकोला यांनी कोणतीही कारवाई केली नाही. परंतु आता अकोला जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात जिल्हा उपनिबंधकांनी ही धडक कारवाई केल्यामुळे कृपलानीसह अवैध सावकारीचा व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणल्याचे पहायला मिळत आहे. या कारवाईत कृपलानी याच्याकडे नेमके काय घबाड प्राप्त झाले, याची माहिती लवकरात लवकर बाहेर येईलच. दरम्यान, बुलढाणा जिल्ह्यातही कृपलानी याच्याकडून आर्थिक शोषण झालेले पीडित आहेत. त्यासंदर्भात देखील कारवाई होणे गरजेचे आहे. त्यासाठी जिल्हा उपनिबंधक बुलढाणा यांना याबाबत सक्रिय भूमिका बजावावी लागणार आहे. अकोला जिल्हा उपनिबंधकांचा हा आदर्श घेऊन कारवाई करावी लागणार आहे. अर्थात, त्यासाठी इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. बुलढाणा जिल्हा उपनिबंधकांना यासंदर्भातील माहिती लागल्यास दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज पुरवण्यास तयार देखील आहे. कृपलानी सारख्या अनेक अवैध सावकारांच्या विरोधात शेतकऱ्यांच्या बाजूने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने लढत राहणार, यात काही शंका नाही.





अवैध सावकार विरोधात कारवाईसाठी आलेले हेच ते वाहने व पथक...

**अकोला येथील मनोहर कृपलानी व त्यांच्या परिवारातील सदस्यांच्या नावे अकोला,बुलडाणा सावकारिचे लायसन्स आहे का व नसल्यास त्यांनी सावकारीचे किती व्यवहार केले व या प्रकरणात न्यायप्रविष्ट किती प्रकरणे सुरू आहेत याची उच्चस्तरीय चौकशी होऊन दोषी आढळल्यास त्यावर कडक कारवाई व्हावी ही तक्रारकर्त्यांची मागणी आहे या सर्व प्रकरणातील बरीच काही माहिती पुराव्यानिशी आमच्याकडे उपलब्ध आहे व आम्ही अमरावती,अकोला,बुलडाणा जिल्हा उपनिबंधक कार्यालयात अवैध सावकारी दाखल असलेल्या प्रकरणात कासवगतीने सुरू असलेल्या प्रकरणाचा उलगडा पुढील प्रत्येक सत्रात प्रकाशीत करणार आहोत**

अजून बरेच काही पुढील भागात..

# मुलीचे अश्लील फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची व्यावसायिकाला धमकी, तरुणाविरोधात गुन्हा दाखल...

**वृत्तसंस्था/ अमरावती**

पाच लाख रुपये दे; अन्यथा तुझ्या मुलीचे माझ्यासोबतचे अश्लील फोटो सोशल मीडियावर व्हायरल करेल, अशी धमकी देत एका व्यावसायिकाकडे खंडणी मागण्यात आली. तसेच ते फोटो व्यावसायिकाच्या पुतण्याच्या सोशल मीडियावरील आयडीवर पाठविण्यात आले. या प्रकरणी कोतवाली ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अध्ययन चव्हाण रा. कानपूर, उत्तरप्रदेश असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. कोतवाली ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या व्यावसायिकाच्या मुलीची आणि आरोपीची सोशल मीडियावर ओळख झाली होती. मात्र, त्यानंतर अध्ययन तिला त्रास देऊ लागला. त्यामुळे तिच्या व्यावसायिक वडिलांनी १५ डिसेंबर २०२३ रोजी अध्ययनशी मोबाइलद्वारे संपर्क साधला. त्यावर तुमच्या महिला नातेवाइकाचे आणि माझे खासगी फोटो माझ्याकडे आहेत. ते फोटो व्हायरल होऊ द्यायचे नसतील, तर दहा दिवसांत ५ लाख रुपये देण्याची मागणी त्याने केली. न दिल्यास ते फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी त्याने दिली. त्याला समजविण्याचा प्रयत्न केल्यावर त्याने त्यांना शिवीगाळ केली.अध्ययन समजण्याच्या मानसिकतेत नसल्याने मला तुझ्या आईशी बोलायचे आहे, असे व्यावसायिकाने म्हटले. त्यावर अध्ययनने एका महिलेजवळ आई म्हणून मोबाईल दिला. तुमचा मुलगा अत्यंत चुकीचे वागत आहे, त्याला समजून सांगा, अशी विनंती त्यांनी केली. त्यावर त्या महिलेनेदेखील मेरा बेटा जैसे बोल रहा है, उतने पैसे लाकर दे दो, फिर मै उसको बोलती हू. नही तो वह फोटो व्हायरल कर देगा, अशी धमकी त्या महिलेने दिली. मोबाइलवर बोलत असतानाच अध्ययनने व्यावसायिकाच्या पुतण्याच्या सोशल मीडियावरील आयडीवर त्यांच्या मुलीचे त्याच्यासोबत असलेले काही अश्लील फोटो पाठविले. आता तर ते फोटो केवळ तुझ्या नातेवाइकाच्या आयडीवर पाठविले. पाच लाख रुपये न दिल्यास ते सोशल मीडियावर व्हायरल करेन, अशी धमकी त्याने दिली. त्यानंतर अध्ययनने व्यावसायिक आणि त्यांच्या मुलीला वारंवार कॉल करून धमक्या दिल्या. अध्ययननचा त्रास वाढत चालल्याने व्यावसायिकाने अखेर कोतवाली ठाण्यात तक्रार दाखल केली



दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुंदरकांडचे वाचन व श्रवण अत्यंत फलदायी आहे. - सुश्री अलकाश्रीजीं






**जनसंचलन/बुलढाणा**

सद्भावना सेवा समितीद्वारा दि ६ प्रथम दिवशी संत सुश्री अलकाश्रीजीं यांचे सुश्राव्य संगीतमय सुंदरकांड हजारोंच्या उपस्थितीत पार पडले. सर्व श्रोत्यांनी सुंदरकांडचे सामूहिक वाचन केले. रामायणातील सुंदरकांड मानवी जीवनाला कल्याणकारी व फलदायी आहे असे उद्गार सुश्री अलकाश्री यांनी काढले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्य यजमान श्रीमती सरलादेवी अग्रवाल, प्रवीण अग्रवाल, पंकज अग्रवाल, आश्रुबा शेवाळे मामा, दैनिक यजमान कैलाश भडेच, पूरणमल शर्मा यांनी स्टेजवर पूजन करून स्वागत केले. सद्भावना समितीचे अध्यक्ष राधेशाम चांडक, बुलडाणा अर्बन चॅरीटेबल सोसायटीच्या चेअरमन सौ कोमलताई सुकेशजी झंवर, ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय बुलढाणाच्या ब्रम्हाकुमारी उर्मिला, सौ माधुरी घोरपडे, सौ अर्पिता शिंदे यांनी स्टेजवर देवीजीचे पुष्पहार घालून स्वागत केले. गुरव समाज महिला मंडळाने सुंदरकांडच्या दिवसाची जबाबदारी घेतली रांगोळी, सजावट राम दरबारची झांकी, आरतीची तयारी सर्व या मंडळाने केले. अलकाश्री यांचे मंडमापून फुलांच्या पाकळ्या पूर्ण रस्त्यावर टाकत सौ. प्रणिता चिंचोळकर, डॉ सौ सुप्रिया वाघमारे, गंगा इंगळे, मंगला इंगळे, सौ उज्वला चिंचोळकर, मनीषा शिंदे , कविता गुरव, मधुरा गुरव, सौ सारिका चिंचोलकर, संध्या शिंदे, वैशाली तायडे, श्रध्दा शेंडे, सविता दाभाडे यांनी व्यासपीठापर्यंत स्वागत करीत नेले. सायंकाळच्या आरती मध्ये मुख्य यजमान अग्रवाल परिवार, शेवाळे मामा ,भाईजी, कोमलताई झंवर यांनी स्टेजवर आरती केली. व्यासपीठासमोर सौ.किरण चिराणिया,सौ.रत्ना जयस्वाल,सौ. आरती शर्मा,सौ.आरती झंवर, दिलीप गट्टाणी,प्रा दिलीप डोमळे यांनी आरती केली.जांगिड समाजाने सुंदरकांडच्या प्रसादाचे आयोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा प्रकाशचंद पाठक, सचिव सद्भावना सेवा समिती यांनी केले.सौ. अंजली परांजपे यांनी आभार मानले. या सुंदरकांडला श्रोत्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. व्यासपीठ पूजा व्यवस्था मनमोहन शर्मा व लाला माधवाणी यांनी पार पाडली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंपालाल शर्मा, राजेश देशलहरा, सुरेश गट्टाणी, सिध्दार्थ शर्मा, उमेश मुंदडा, विजय शर्मा, गजानन कुलकर्णी, श्रीकांत टेंबीकर, मदनलाल शर्मा, सुभाष घोरपडे, श्रीराम मारोती मंदिर संस्थानचे पदाधिकारी आणि सद्भावना सेवा समितीचे सर्व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले. यावेळी अखिल भारतीय जांगिड समाजाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पूरणमल शर्मा यांच्या वाढदिवसानिमित्त सुश्री अलकाश्रीजीं यांनी त्यांचे व्यासपीठावर पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# जिल्ह्यात कॉपी मुक्त अभियान राबविण्यात येणार...

**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यात दहावी आणि बारावीची परीक्षा येत्या कालावधीत घेण्यात येणार आहे. या परीक्षा चांगल्या वातावरणात होण्यासाठी जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येणार आहे. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र बारावी परीक्षा दि. २१ फेब्रुवारी २०२४ ते दि. १९ मार्च २०२४ या कालावधीत घेण्यात येणार आहे. तसेच दहावीची माध्यमिक शालांत परीक्षा परीक्षा दि. १ ते २६ मार्च २०२४ या कालावधीत घेण्यात येणार आहे. जिल्ह्यात परीक्षा संचालन योग्यप्रकारे व्हावे, तसेच परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये, यासाठी जिल्ह्यात कॉपी मुक्त अभियान राबविण्यात येत आहे. यासाठी परीक्षेपुर्वी दक्षता समिती मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. परीक्षा केंद्र परिसरात कलम १४४ लागू करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रांच्या ५० मीटर परीसरातील कॉम्प्युटर सेंटर, झेरॉक्स सेंटर, मोबाईल सेंटर परीक्षा सुरु होण्यापूर्वी २ तास आधीपासून परीक्षा संपेपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणा उपलब्ध राहणार आहे. यंत्रणा कार्यरत असून चित्रीकरणाची साठवणूक होत असल्याची खातरजमा करण्यात येणार आहे. तसेच परीक्षा केंद्राचे झूम व्हिडीओच्या माध्यमातून गैरप्रकार होऊ नये, यासाठी नियंत्रण केले जाणार आहे. कॉपी मुक्त अभियान गैरमार्गाशी लढा या संदर्भात सर्व विभाग प्रमुख यांनी परीक्षा केंद्रांस भेट देण्यासाठी सूचित करण्यात आले आहे. जिल्ह्यामध्ये १६ परिरक्षक



केंद्र राहणार आहे. सर्व परिरक्षक केंद्रावर सीसीटीव्ही कार्यान्वित असणार आहे. तसेच परिरक्षक केंद्रावरून पेपर घेतल्याची वेळ व पेपर जमा करण्याची वेळेबाबत सीसीटीव्हीद्वारे नजर ठेवण्यात येणार आहे. परिरक्षक केंद्रावरून पेपर घेऊन जाणे आणि जमा करण्यासाठी ज्या संस्था, शाळेचे परीक्षा केंद्र आहे, त्या शाळेच्या संस्था प्रमुख, शाळेचे मुख्याध्यापक, केंद्रसंचालकामार्फत नियुक्त असलेला रनर शिक्षक यांना चारचाकी वाहन देण्यात येणार आहे. त्यांना मोटारसायकलचा वापर करण्यासाठी मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सात भरारी पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. बारावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यामध्ये ११७ परीक्षा केंद्र राहणार आहे. यात मुले १९ हजार ३५१, मुली १५ हजार ४०६ असे एकुण ३४ हजार ७६५ विद्यार्थी परीक्षा देणार आहे. दहावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यात एकूण १५६ परीक्षा केंद्र राहणार आहे. यात मुले २२ हजार ६४ आणि मुली १८ हजार १९४ असे एकूण ४० हजार २५९ विद्यार्थी परीक्षा देणार आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रावर महसूल विभागाची बैठे पथकाची नेमणूक करण्यात येणार आहे. बैठे पथक परीक्षा सुरु होण्यापूर्वी परीक्षा केंद्रावर किमान एक तास अगोदर तसेच परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका परिरक्षण केंद्रावर पाठवेपर्यत थांबणार आहे. परीक्षेशी संबधित घटकांनी नियमबाह्य पद्धतीने मोबाईल अथवा इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा वापर परीक्षा केंद्रावर होणार नाही याची दक्षता घेण्यात येणार आहे. परीक्षा कॉपीमुक्त व शांततापूर्ण वातावरणात पार पडणे आवश्यक आहे. परीक्षेत गैरप्रकारांना वाव मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होऊन शैक्षणिक दर्जा घसरु शकते. भावी पिढी सक्षम होण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचावणे, टिकविण्यासाठी सदर परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त, तणावमुक्त व शांततापूर्ण वातावरणात पार पडण्यासाठी परीक्षेशी संबधित अधिकारी, कर्मचारी शिक्षकांनी पारदर्शकपणे कार्य करावे, तसेच पालकांनी पाल्यांना कॉपीमुक्त, तणावमुक्त वातावरणात परीक्षेकरीता प्रोत्साहित करावे, असे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी आवाहन केले आहे.

# मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा येथे वार्षिक स्नेह संम्मेलनाला सुरुवात...



**जनसंचलन/बुलडाणा**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संचलित मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा येथे वार्षिक स्नेहसंम्मेलनाला सुरुवात झाली आहे. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्याच्या दृष्टीकोनातुन यावर्षी ही वार्षिक स्नेह संम्मेलनाच आयोजन करण्यात आल आहे . या स्नेह संम्मेलनाच उदघाटन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयातील सैनिक संघटक विष्णु उबरहंडे यांच्या हस्ते झाले . यावेळी डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ.अण्णासाहेब म्हळसने स्नेहसंम्मेलन प्रमुख प्राध्यापिका मनिषा थुट्टे उपस्थित होत्या यावेळी उदघाटन भाषणात विष्णु उंबरहंडे म्हणले की विद्यार्थींनी शैक्षणीक जिवनात येणाऱ्या अडीअडचीणीवर मात करून स्पर्धात्मक आवाहन पेलण्यासाठी सज्ज रहा .. भारतीय सैन्यामध्ये असलेल्या संधी बाबतही त्यांनी मार्गदर्शन केल यावेळी मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक अण्णासाहेब म्हळसणे मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्यातील उपजन कला गुणांना वाव देण्यासाठी स्नेह संम्मेलनात सहभागी होऊन आपल्या कला सादर कराव्यात असे आवाहन केले यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कला सादर केल्यात स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थीनी आणि प्राध्यापक प्राध्यापक इतर कर्मचारी उपस्थित होते

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## स्वरविहार संगीत विद्यालयाच्या डॉ. पल्लवी जोशी गायन विषयात विशेष योग्यता श्रेणीमध्ये उत्तीर्ण



जनसंचलन/बुलढाणा

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई अंतर्गत नोव्हेंबर/डिसेंबर- २०२३ या सत्राचे गायन,वादन व नृत्य या विषयांचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून यामध्ये स्वरविहार संगीत विद्यालयातील डॉ.सौ.पल्लवी जोशी प्रवेशिका पूर्ण परीक्षेत गायन विषयात विशेष योग्यता श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाल्या आहेत. नोव्हेंबर डिसेंबर २०२३ या सत्रा मध्ये स्वरसाधना संगीत विद्यालय,बुलढाणा केंद्र क्रमांक ८८७ या परीक्षा केंद्रावरून डॉ.सौ. पल्लवी जोशी यांनी ही परीक्षा दिली होती. डॉ.पल्लवी जोशी ह्या बुलढाणा शहरांमध्ये होमिओपॅथी तज्ञ म्हणून सुपरिचित असून त्या उत्तम नाटककार, अभ्यासू वक्ता, उत्कृष्ट निवेदिका म्हणून देखील त्यांची ओळख आहे. एवढ्या व्यस्तते मध्ये सुद्धा त्या स्वरविहार संगीत विद्यालय बुलढाणा येथे नियमित गायन विषयाचे धडे घेत आहेत सदर परीक्षेसाठी त्यांना स्वरविहार संगीत विद्यालयाचे संचालक प्रा.रविकिरण मोरे व प्रा.अमोल दिशागज यांनी मार्गदर्शन केले असून केंद्र व्यवस्थापक अरविंद टाकळकर गुरुजी तसेच बुलढाणा शहरात संपूर्ण वैद्यकीय तथा संगीत क्षेत्रातील मान्यवरांकडून डॉ.पल्लवी जोशी यांचे अभिनंदन होत आहे.

## सारथी प्रणालीमध्ये तांत्रिक अडचणी...



जनसंचलन/बुलडाणा

सारथी प्रणालीमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे वाहन चालक अनुज्ञप्तीचे कार्यालयीन आणि शिबीर कार्यालयाचे कामकाज बाधीत झाले आहे. सदर अडचणीचे निराकरण झाल्यानंतर कामकाज पूर्ववत सुरु होईल, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद गाजरे यांनी कळविले आहे.

# जिल्ह्यात खामगाव, चिखली येथे महासंस्कृती महोत्सव -जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील...

## नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन...



जनसंचलन/बुलडाणा

पर्यटन व सांस्कृतिक विभाग, जिल्हा प्रशासनाच्या वतीने खामगाव आणि चिखली येथे महासंस्कृती महोत्सव-ाचे आयोजन करण्यात आले आहे. खामगाव येथे दि. १२ आणि १३ फेब्रुवारी, तर चिखली येथे दि. २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान महासंस्कृती महोत्सव होणार आहे. नागरिकांनी या सांस्कृतिक महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. खामगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदानात सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम रंगणार आहे. सोमवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी संगीत रजनी होणार असून यात राहूल सक्सेना आणि त्यांचा संच मराठी आणि हिंदी गीतांचा कार्यक्रम सादर करतील. मंगळवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनवर आधारीत महानाट्य ङ्गनिश्चय पूर्तीचा महामेरूफ होणार आहे. तसेच शनिवार, दि. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसहा वाजता स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त मॅरेथॉन आणि सकाळी साडेनऊ वाजता रांगोळी स्पर्धा होणार आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी बचतगटांच्या स्टॉल्सच्या माध्यमातून खाद्य संस्कृतीचे आयोजन करण्यात आले आहे. चिखली येथे तालुका क्रीडा संकुलात मंगळवार, दि. २० फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राची लोकधारा कार्यक्रमात महाराष्ट्राची संस्कृती दर्शविणारा कलाविष्कार महाराष्ट्राचा महानायक अनिरूद्ध जोशी आणि सहकलाकार सादर करणार आहे. बुधवार, दि. २१ फेब्रुवारी रोजी सुधीर फडके आणि आशा भोसले यांच्या मराठी, हिंदी गाण्यांचा कार्यक्रम नक्षत्रांचे देणे कार्यक्रम सारेगम विजेता ऋषिकेश रानडे, फिल्मफेअर अवार्ड विजेती आनंदी जोशी आणि सहकलाकार सादर करतील. गुरूवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी जागर लोककलेचा कार्यक्रमात झाडीपट्टी ग्रुप दंडार, नंदकिशोर ग्रुप भारूड, इंगळे आणि सहकारी गोंधळ, पोवाडा, गणेश कदम वासुदेव कला सादर करतील. तसेच नामांकित कलाकारांचे कवि, हास्य संमेलन आणि दिप्ती आहेर यांचा लावणीचा कार्यक्रम सादर करतील. याच ठिकाणी रविवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसहा वाजता स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त मॅरेथॉन आणि सकाळी साडेनऊ वाजता रांगोळी स्पर्धा होणार आहे. जिल्ह्यात पाच दिवस सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. यातून लोकधारा आणि संस्कृतीचे आदान-प्रदान होणार आहे. तसेच लोककलांचे जतन होणार आहे. नागरिकांनी या सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# अवैध धंदे बंद करण्यासाठी सुरु असलेल्या आंदोलनाची ११ व्या दिवशी सांगता

## उपविभागीय पोलिस अधिकारी सुधिर पाटलांनी दिले लेखी आश्वासन



जनसंचलन/बुलडाणा

अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे युवा प्रदेशाध्यक्ष पुरुषोत्तम बोर्डे व पत्रकार इसरार देशमुख हे जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालय समोर बुलढाणा, रायपूर, चिखली पोलिस स्टेशन हद्दीतील अवैध धंदे, वरली, मटका, जुगार अड्डे बंद करण्यासाठी बेमुदत आंदोलन दिनांक २६ जानेवारी २०२४ पासुन सुरु होते, त्या आंदोलनाची सांगता उपविभागीय पोलिस अधिकारी सुधिर पाटिल यांनी लेखी पत्र देउन बुलडाणा शहर,चिखली, रायपुर हददीतील अवैध धंदे बंद करन्याचे आश्वासन दिले, या वेळी बुलढाणा शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार ठाकरे, पीएसआय लोधी उपस्थित होते. तसेच सदर प्रकरणी यापुर्वी वरील पोलीस स्टेशने हददीमध्ये अवैध धंदे होणार नाहीत यादृष्टिने प्रभावी कार्यवाही करण्यात आलेली असुन, सध्या सुध्दा अवैध धंद्यावर वेळोवेळी कारवाई करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आमचे अधिनस्त पो स्टे प्रभारी अधिकारी, उपविभाग बुलडाणा यांना अवैध धंदे सुरु राहणार नाही. याकरीता आदेशित करण्यात आलेले आहे.अवैध धंदे समुळ नष्ट करण्याचे दृष्टिने कार्यवाही करण्यात येत आहे. तरी आपण आपले जिल्हाधिकारी कार्यालया समोर सुरु केलेले धरणे आंदोलन मागे घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे असे लेखी आश्वाशित केले. तर या आंदोलनास अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे प्रदेशाध्यक्ष इंजि.डी.टी शिपने, जिल्हाध्यक्ष प्रकाश डोंगरे,काँगेस नेत्या ॲड जयश्री ताई शेळके,भाजप नेते माजी आमदार विजयराज शिंदे, खासदार प्रतापराव जाधव, वरोडीचे सरपंच सुधाकर गारोळे, आंदोलन सम्राट भारत चव्हाण यांच्या सह विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी भेटी देऊन आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

## डाक विभागातर्फे श्री शिंदे गुरुजी कन्या विद्यालय मध्ये सुकन्या समृद्धी योजने विषयी जागृती अभियान



जनसंचलन/बुलढाणा

डाक विभागाने महिला सन्मान बचत पत्र , सुकन्या समृद्धी योजना, आरडी इत्यादी विविध बचती संबंधी योजना विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना देण्याच्या दृष्टिकोनातून श्री शिंदे गुरुजी कन्या विद्यालय येथे कार्यक्रमाचे आयोजन केले. याप्रसंगी भारतीय डाक विभागाचे अधिकारी व कर्मचारी मार्गदर्शन करण्यासाठी व प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी उपस्थित होते. श्री विजय फदाट ,श्री साळवे, श्री संजय काळे श्री सुसर व असिस्टंट पोस्टमास्टर यांनी पोस्ट खात्याच्या विविध बचतीच्या योजनांची माहिती दिली. विद्यार्थिनींनी देखील चौकसपणे आपले प्रश्न विचारून अधिक माहिती घेतली. श्री शिंदे गुरुजी कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनी ह्या प्रामुख्याने ग्रामीण भागातल्या व गरीब परिस्थितीतल्या आहेत. बचतीच्या माध्यमातून आपली परिस्थिती बदलू शकते . गरिबीवर मात करण्यासाठी अभ्यास, मेहनत व कष्टा सोबतच आर्थिक नियोजन समजणे ही महत्वाचे आहे . बालपणापासून बचतीची सवय असली पाहिजे. आर्थिक नियोजन समजणे ही महत्वाचे आहे. असे विचार अध्यक्षपदावरून बोलताना मुख्याध्यापिका, डॉ संजीवनी शेळके यांनी व्यक्त केले . कार्यक्रमाचे संचालन श्री संजय वाघ यांनी केले आभार प्रदर्शन मिलिंद मोरे यांनी केले श्री राजेंद्र शिरसाठ, सुलभाताई सोनूने, गजानन फोलाने, यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# भाजप-शिंदे गटात धुसफूस,आदित्य ठाकरेंचा कल्याण दौरा; श्रीकांत शिंदेंविरुद्ध उमेदवारीची चर्चा...

वृत्तसंस्था/ कल्याण

शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नुकताच कल्याण लोकसभेचा दौरा केला. उद्धव ठाकरे यांच्यानंतर आता त्यांचे सुपुत्र आदित्य ठाकरे हेसुद्धा गुरुवारी कल्याणमध्ये येत आहेत. पक्षफुटीनंतर ते देखील पहिल्यांदाच कल्याण लोक सभेत आपले पाऊल ठेवणार आहेत. सध्याच्या घडीला कल्याणमध्ये भाजप आणि शिवसेना शिंदे गटामध्ये धुसफूस सुरू असताना ठाकरे गटाचे शिलेदार आदित्य ठाकरे कोळसेवाडी परिसरात येत आहेत. त्यामुळे या सर्व घडामोडींवर ते काय भाष्य करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवसेना पक्षफुटीनंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे किंवा त्यांचे सुपुत्र युवा नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी कल्याण लोकसभेचा दौरा केला नव्हता. विधानसभा अध्यक्ष यांनी शिवसेना ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीच असा निकाल देताच उद्धव ठाकरेंनी राज्यात संपर्क दौरा आयोजित केला. त्याची सुरवातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला आणि सुपुत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण लोकसभा मतदारसंघातून केली.ठाकरे यांचा हा दौरा चांगलाच गाजला. यानंतर नुकतेच ठाकरे गटाचे नेते संजय राऊत हे देखील डोंबिवली दौऱ्यावर येऊन गेले आहेत. यावेळी त्यांनी सत्ताधाऱ्यांवर आपला निशाणा साधल्याचे पहायला मिळाले आहे. यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे युवासेना प्रमुख व माजी मंत्री आदित्य ठाकरे हे कल्याण येथे येत्या गुरुवारी ८ फेब्रुवारीला येत आहेत. कल्याण कोळसेवाडी येथील शाखेला ते भेट देणार आहेत. सायंकाळी ६ वाजता ते येणार असून जास्तीत जास्त शिवसेना , महिला



आघाडी व युवासेना पदाधिकारी यांनी शिवसैनिक कार्यकर्त्यांसह उपस्थित रहावे असे आवाहन शिवसैनिकांनी केले आहे.

## गळफास घेऊन ४५ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या

जनसंचलन/ नांदुरा

तालुक्यातील पातोंडा गाव येथील एका ४५ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी उघड झाली. रवींद्र रामदास झाल्टे (४५) वर्ष रा. पातोंडा) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. याबाबत नारायण जनार्दन झाल्टे यांनी नांदुरा पोलीस स्टेशनला माहिती दिली. सोमवारी सायंकाळी कामानिमित्त नांदुरा येथे येत असताना त्यांना दुरध्वनीद्वारे माहिती मिळाली त्यानुसार, त्यांचे काका रवींद्र रामदास



झाल्टे यांनी त्यांच्या शेतात लिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेला असल्याचे कळले. त्यावरून त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता त्यांचे काका त्या ठिकाणी गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले. या माहितीवरून नांदुर पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली आहे.


## अल्पवयीन मुलीचे अपहरण; आरोपी राजस्थानातून अटक

जनसंचलन/ खामगाव

तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलीस शे. तसलीम (२५, रा. बोथाकाजी) याने फूस लावून दुचाकीने पळवून नेल्याची घटना घडली होती. त्यातील आरोपीला खामगाव ग्रामीण पोलिसांनी सोमवारी राजस्थानमधील कोटा येथून ताब्यात घेतले आहे. या घटनेत शे. तसलीम याचे आजोबा शे. सलिम शे. फरीद (६२) व आजी जमीलाबी (६०) दोन्ही रा. बोथाकाजी यांनी त्यास मदत केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले. तपासादरम्यान पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या



आधारे ५ फेब्रुवारी रोजी शे. तसलीम व अल्पवयीन मुलीसह राजस्थानमधील कोटा येथून ताब्यात घेतले. तर आरोपीस मदत करणारा शे. समिर शे. कालू यास काही दिवसापूर्वी ताब्यात घेतले होते. ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी विनोद ठाकरे यांच्या मार्गदर्शनात ग्रामीण ठाण्याच्या उपनिरीक्षक राची पुसाम, पोहेकॉ गणेश जाधव, बाळू फुंडकर, महिला पोकॉ. मोनिका किलोलीया यांनी केली.




## मंडळ अधिकाऱ्याला उतरवून देत रेतीचा टिप्पर पळवला!

## पाच जणांविरुद्ध ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल

जनसंचलन/ खामगाव

रेतीची अवैध वाहतूक करणारे टिप्पर पकडल्यानंतर खामगाव पोलिसांत आणण्यासाठी टिप्परमध्ये बसून येत असताना मंडल अधिकाऱ्याला उतरवून देत टिप्पर भरधाव पळवून नेल्याची घटना सोमवारी रात्री टेंभुर्णानजीक घडली. तक्रारीवरून चालकासह पाच जणांविरुद्ध खामगाव ग्रामीण पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले. खामगाव तहसीलमधील मंडल अधिकारी शिवाजी केशव भरगडे (५०) हे सोमवारी रात्री अटाळी येथून खामगावकडे येत होते. दरम्यान, टेंभुर्णा फाट्यानजीक त्यांना एक विनाक्रमांकाच्या टिप्पर रेती वाहतूक करताना दिसला. त्यांनी टिप्परचालकास थांबवून चौकशी केली, त्यातील रेती अवैध असल्याने टिप्पर पोलिस ठाण्यात घेण्यास सांगितले. त्यावेळी ते स्वतः टिप्परमध्ये बसले. मात्र, पुढे गेल्यानंतर



काही वेळातच चार ते पाच जण आले. त्यांनी मंडल अधिकारी भरगडे यांना बळजबरीने खाली उतरवून दिले. तसेच, टिप्परमधील रेती रस्त्यावर टाकली. ते सर्वजण टिप्पर घेऊन सुसाट वेगाने पसार झाले. याबाबत भरगडे यांनी खामगाव ग्रामीण ठाण्यात तक्रार दिली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958